# जिल्हा परिषदांमधील इतर नियमबाह्य बाबी.

**3.993 अखर्चित रक्कम शासनास परत न करणे.**

शासन परिपत्रक, ग्रामविकास विभाग, क्रमांक पंरास/1085/प्र.क्र. 587/23, दिनांक 3 डिसेंबर 1985 नुसार जिल्हा परिषदांना शासनाकडुन मिळालेल्या अनुदानाच्या रक्कमा व अस्थायी अर्थोपाय अग्रिम रक्कमा यापैकी अखर्चित व असमायोजित रक्कमा शासनाकडे त्वरीत भरणा करणेबाबत आदेश आहेत. तथापि, सन 2014-2015 चे लेखापरीक्षणात पुढील जिल्हा परिषदांकडे शासनास परत करावयाच्या रक्कमा थकित असल्याचे दिसून आले आहे.

| अ.क्र. | जिल्हा परिषदेचे नाव | जिल्हा परिषदेचा विभाग | लेखापरीक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | गुंतलेली रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 1 | ठाणे | वित्त | 6 | 2,06,11,755/- |
| 2 | धुळे | वित्त | 20 | 64,29,53,934/- |
| 3 | अहमदनगर | बांधकाम | 2 | 14,56,56,000/- |
| 4 | पुणे | एकात्मिक बालविकास | 1 | 1,13,59,095/- |
| 5 | सातारा | लघुपाटबंधारे | 2 | 1,93,54,345/- |
| 6 | सोलापूर | ग्रामीण पाणीपुरवठा | 38 | 6,71,99,000/- |
| 7 | सोलापूर | पशुसंवर्धन | 2 | ------ |
| 8 | सोलापूर | एकात्मिक बालविकास | 1 | 2,49,43,000/- |
| 9 | अमरावती | सामान्य प्रशासन | 7 | 11,29,73,408/- |
| 10 | अकोला | पशुसंवर्धन | 9 | 5,08,14,515/- |
| 11 | यवतमाळ | सामान्य प्रशासन | 11 | 13,60,848/- |
| 12 | यवतमाळ | बांधकाम 1 | 2 | 26,64,41,000/- |
| 13 | यवतमाळ | बांधकाम 2 | 3 | 39,21,96,000/- |
| 14 | यवतमाळ | लघुपाटबंधारे | 2 | 4,21,08,000/- |
| 15 | बुलडाणा | शिक्षण | 8 | 15,71,92,390/- |
| 16 | बुलडाणा | पशुसंवर्धन | 1 | 1,17,02,721/- |
| 17 | भंडारा | ग्रामीण पाणीपुरवठा | 6 | 2,30,22,913/- |
| 18 | भंडारा | आरोग्य | 11 | 6,51,17,786/- |
| 19 | भंडारा | एकात्मिक बाल विकास विभाग | 1 | 1,09,50,000/- |
| 20 | भंडारा | वित्त | 4 | 87,23,16,706/- |
| 21 | गोंदिया | सामान्य प्रशासन | 18 | 14,85,835/- |
| 22 | गोंदिया | बांधकाम | 57 | 27,73,71,702/- |
| 23 | गोंदिया | लघुपाटबंधारे | 3 | 1,76,47,391/- |
| 24 | गडचिरोली | बांधकाम | 84 | 27,57,06,097/- |
| 25 | बीड | वित्त | 12 | 3,74,90,38,720/- |
| 26 | लातूर | शिक्षण | 10 | 22,06,400/- |
| 27 | लातूर | बांधकाम | 1 | 47,48,000/- |

### 3.994 पाणीपट्टी थकीत वसुली

जिल्हा परिषदा हया प्रादेशिक पाणीपुरवठयाच्या योजना पूर्णपणे कार्यान्वित झाल्यावर त्या योजना ग्रामपंचायतीकडे हस्तांतरीत करुन पिण्याच्या पाण्यासाठी औद्योगिक विभागांसाठी वेगवेगळया दराने पाणीपट्टी वसूल करतात. पाणीपट्टीच्या रकमा ग्रामपंचायतीकडे थकीत राहिल्याचे सन 2014-2015 या लेखापरीक्षणातून दिसून आले आहे. याबाबत उणिवा खालीलप्रमाणे आहेत. :-

1) वसुलपात्र रकमांबाबत नोंदवहया ग्रामपंचायती, पंचायत समित्या व जिल्हा परिषदा परिपूर्ण करीत नाहीत. त्यामुळे हिशोब तपासणीत अडचणी येतात. मागील थकबाकी, चालू मागणी व व्याज आणि एकूण थकीत रकमा यांचा आढावा घेऊन रकमा वसुलात आणणे आवश्यक असताना याकडे विशेष लक्ष दिलं जात नाही.

2) काही जिल्हा परिषदांच्या लघुपाटबंधारे विभागाच्या स्वतंत्र योजना आहेत. तर ज्या ठिकाणी अशा योजना नाहीत त्या ठिकाणी महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळामार्फत पाणीपुरवठा जिल्हा परिषदा करतात. त्यांची रक्कम थकीत राहिल्याने व्याजरहित व वर्षागणिक रक्कम वाढत आहे. वसुलीसाठी ठोस उपाययोजना जिल्हा परिषदा अंमलात आणत नाही.

3) लघुपाटबंधारे विभागाने योजना राबविल्यानंतर त्या योजना जिल्हा परिषंदाकडे हस्तांतरीत करण्यासाठी जास्त कालावधी लागतो. अशा योजनांची वसुली जास्त प्रमाणात जिल्हा परिषंदाकडे थकीत दिसते. तरी याबाबत योग्य उपाययोजना करुन रकमा वसुलात आणणे आवश्यक आहे. सदर थकीत रकमा काही कोटी रुपयाहून जास्त आहेत. अशा **जिल्हा परिषदांची** माहिती उदाहरणादाखल पुढील तक्त्यात देण्यात येत आहे. तरी रक्कम रुपये 44,84,75,601/- वसुलात आणणे आवश्यक आहे.

| **अ.क्र.** | **जिल्हा परिषदेचे नाव** | **जिल्हा परिषदेचा विभाग** | **लेखापरीक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक** | **गुंतलेली रक्कम रुपये** |
|---|---|---|---|---|
| **1** | **2** | **3** | **4** | **5** |
| 1 | नाशिक | सामान्य प्रशासन | 11 | 1,63,33,060/- |
| 2 | नाशिक | सामान्य प्रशासन | 12 | 2,91,01,048/- |
| 3 | नाशिक | ग्रामीण पाणीपुरवठा | 17 | 8,96,50,664/- |
| 4 | अहमदनगर | ग्रामीण पाणीपुरवठा | 2 | 23,30,32,000/- |
| 5 | पुणे | ग्रामीण पाणीपुरवठा | 51 | 4,41,25,222/- |
| 6 | यवतमाळ | लघुपाटबंधारे | 7 | 17,97,842/- |
| 7 | वर्धा | ग्रामीण पाणीपुरवठा | 30 | 1,61,74,726/- |
| 8 | भंडारा | ग्रामीण पाणीपुरवठा | 8 | 1,60,14,520/- |
| 9 | गोंदिया | ग्रामीण पाणीपुरवठा | 15 | 22,46,519/- |

### 3.995 हातपंप/विद्युतपंप देखभाल/दुरुस्ती वर्गणीची थकबाकी.

जिल्हा परिषद पाणीपुरवठयाच्या सोयीसाठी पंचायत समित्या व ग्रामपंचायतीच्या क्षेत्रामध्ये बोअरिंग करुन त्यावर हातपंप व विद्युतपंप बसवितात व नंतर सदर योजना ग्रामपंचायतीकडे हस्तांतरीत करुन पाणीपुरवठा केला जातो. परंतु पंपामध्ये बिघाड झाल्यास त्यांची दुरुस्ती व देखभाल जिल्हा परिषदा करतात. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग परिपत्रक क्रमांक जीडबल्युडी-1431/सीआर-4584/168, दिनांक 11 सप्टेंबर, 1981 नुसार हातपंप

देखभाल व दुरुस्तीसाठीची वर्गणी तसेच ग्रामविकास विभाग पत्र क्रमांक 1480/4617/(4571)/16, दिनांक 31 जुलै, 1981 नुसार विद्युतपंपाची देखभाल व दुरुस्तीसाठीची वर्गणी ग्रामपंचायतीकडून वसूल करावयाची असते व ग्रामीण पाणीपुरवठा निधीमध्ये जमा करावयाची असते.

खालील तपशिलात दिलेल्या जिल्हा परिषदांकडे सदर वर्गणी फार मोठया प्रमाणात व दीर्घ कालावधीपासुन थकीत दिसून आली आहे. ग्रामपंचायती, पंचायत समित्या व जिल्हा परिषदांकडून याबाबतच्या नोंदवहयासुध्दा अपूर्ण ठेवल्या जातात आणि वर्गणी वसुलीसाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले जात नाहीत. तरी वर्गणी त्वरीत वसुल करुन ग्रामिण पाणीपुरवठा निधीत जमा करणे आवश्यक आहे. अन्यथा योजनेचा मूळ उद्देश सफल होणार नाही.

| अ.क्र. | जिल्हा परिषदेचे नाव | जिल्हा परिषदेचा विभाग | लेखापरीक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | गुंतलेली रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 1 | ठाणे | ग्रामीण पाणीपुरवठा | 10 | 1,04,21,118/- |
| 2 | सिंधुदूर्ग | ग्रामीण पाणीपुरवठा | 27 | 6,04,000/- |
| 3 | नंदुरबार | ग्रामीण पाणीपुरवठा | 6 | 69,77,685/- |
| 4 | जळगांव | ग्रामीण पाणीपुरवठा | 4 | 1,66,645/- |
| 5 | सोलापूर | ग्रामीण पाणीपुरवठा | 27 | 62,08,098/- |
| 6 | यवतमाळ | ग्रामीण पाणीपुरवठा | 18 | 4,64,88,209/- |
| 7 | वर्धा | ग्रामीण पाणीपुरवठा | 31 | 93,87,141/- |
| 8 | भंडारा | ग्रामीण पाणीपुरवठा | 9 | 34,74,434/- |

**3.996 जिल्हा परिषदमधील अपूर्ण स्थितीतील बांधकामे.**

जिल्हा परिषदांना त्यांच्या कार्यक्षेत्रातील ग्रामीण भागामध्ये पिण्याच्या पाण्याच्या पुरवठा योजना, विहिरी, (निष्फळ/सुरु झालेल्या परंत अपूर्ण) खेडयातील, जिल्यातील रस्ते दुरुस्ती, प्राथमिक आरोग्य केंद्राची दुरुस्ती व बांधकामे, पशुवैद्यकीय दवाखाना, शाळागृहे, समाजमंदिरे दुरुस्ती व बांधकामे, कोल्हापूर टाईप बंधारे इत्यादी स्थानिक व सामुहिक विकासाच्या जिल्हा परिषद, शासकीय व अभिकरण निधीतील योजनांना ज्या वर्षी मंजूरी दिली जाते. त्या वर्षात ती कामे पूर्ण होण्याची शासनाची अपेक्षा असते. तथापि, त्यापैकी काही कामे विभिन्न कारणांमुळे त्या त्या वर्षात पूर्ण होत नाहीत. अशी अपुर्णावस्थेतील कामे वर्षानुवर्षे पडुन असतात. त्यामुळे त्यात गुंतलेला पैसा निरर्थक अडकून पडतो. त्याचप्रमाणे स्थानिक जनतेला विकास योजनांचा लाभ मिळू शकत नाही. तसेच अशी बांधकामे फार काळ अपुर्णावस्थेत राहिल्याने त्यांची पडझड होण्याची व त्यामुळे गुंतलेल्या निधीचे नुकसान होण्याची शक्यता असते. यास्तव जिल्हा परिषद व पंचायत समितीने योजनांतर्गत व योजनेत विकास कार्यक्रमाप्रमाणे हाती घेतलेली कामे अपूर्णावस्थेत पडून राहणार नाहीत याची दक्षता घेणे आवश्यक आहे. जिल्हा परिषदांनी पुरविलेल्या माहितीनुसार अशा प्रकारे अपुर्णावस्थेत पडून असलेल्या बांधकामांचा तपशिल पुढीलप्रमाणे वेळ उदाहरणादाखल दिला आहे.

| अ.क्र. | जिल्हा परिषदेचे नाव | जिल्हा परिषदेचा विभाग | लेखापरीक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | गुंतलेली रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 1 | ठाणे | लघुपाटबंधारे | 21 | 7,91,81,691/- |
| 2 | नाशिक | बांधकाम | 290 | 4,36,91,169/- |
| 3 | धुळे | बांधकाम | 64 | 5,42,18,000/- |
| 4 | नंदुरबार | ग्रामीण पाणीपुरवठा | 19 | 4,10,64,950/- |
| 5 | अहमदनगर | ग्रामीण पाणीपुरवठा | 14 | 35,41,715/- |
| 6 | पुणे | लघुपाटबंधारे | 45 | 30,98,33,000/- |
| 7 | पुणे | आरोग्य | 11 | 19,18,42,629/- |
| 8 | सांगली | लघुपाटबंधारे | 29 | 10,10,53,000/- |
| 9 | कोल्हापूर | पशुसंवर्धन | 12 | 1,26,15,963/- |
| 10 | अमरावती | समाजकल्याण | 20 | 34,70,82,000/- |
| 11 | अकोला | लघुपाटबंधारे | 11 | 1,88,20,000/- |
| 12 | अकोला | गामीण पाणीपुरवठा | 16 | 2,86,20,000/- |
| 13 | बुलडाणा | बांधकाम | 58 | 5,15,11,902/- |
| 14 | गोंदिया | लघुपाटबंधारे | 29 | 1,58,27,000/- |
| 15 | गडचिरोली | समाजकल्याण | 22 | 6,34,42,000/- |
| 16 | जालना | ग्रामीण पाणीपुरवठा | 29 | ------ |
| 17 | परभणी | लघुपाटबंधारे | 20 | 2,89,57,000/- |
| 18 | नांदेड | बांधकाम (दक्षिण) | 21 | ------ |
| 19 | उस्मानाबाद | बांधकाम | 56 | 5,11,41,000/- |

**3.997 जिल्हा परिषदेने लेखापरीक्षणासाठी अभिलेखे सादर न करणे**.

मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम, 1930 मधील कलम (3) प्रमाणे ज्या तारखेस लेखापरीक्षणाचे काम सुरु करण्याचे ठरले जाते त्या तारखेसंबंधी आवश्यक तेवढया कालावधीची लेखी नोटीस संबधित जिल्हा परिषदेचे विभाग/पंचायत समित्या यांना कळविण्यात येते. त्यानंतर प्रत्यक्ष लेखापरीक्षण सुरु झाल्यावर अधिनियमाचे कलम 6 (1) नुसार योग्य वाटतील अशा लेख्यांच्या संदर्भात जिल्हा परिषद/पंचायत समित्या यांना अर्धसमास पत्राने अभिलेख्यांची मागणी कळविली जाते व सदरचे अभिलेखे विहित मुदतीत सादर करणेबाबत कालावधी दिला जातो. तरीसुध्दा लेखापरिक्षणास कागदपत्रे/अभिलेखे उपलब्ध केले जात नाहीत. त्या त्या जिल्हा परिषद/विभाग/पंचायत समिती अंतिमीकरणाच्या वेळी अभिलेखे उपलब्ध न केलेल्या आक्षेपांबाबत सविस्तर चर्चा करतानाही असे अभिलेख उपलब्ध करणे टाळण्यात येते. त्यामुळे असे परिच्छेद लेखापरीक्षण अहवालात समाविष्ट केले जातात. अशा प्रकारचे परिच्छेद लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालामध्ये निवड करणेसाठी प्रस्तावित केले जातात व संबंधित जिल्हा परिषद विभागांना निवड केलेले परिच्छेद कळवून त्याबाबतचे अनुपालन मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद आणि मुख्य लेखा व वित्त् अधिकारी आणि गटविकास अधिकारी यांना 15 दिवसांच्या आत सादर करणेबाबत सूचित केले जाते. तथापि, या सूचनेबाबतही जिल्हा परिषद व पंचायत समित्या गांर्भीर्याने लक्ष देत नसल्याचे आढळून येते. वर नमूद केल्याप्रमाणे संबंधित जिल्हा परिषद विभाग व पंचायत समिती यांना लेखे उपलब्ध करुन देणेसाठी आवश्यक

तेवढया संधी उपलब्ध करुन देऊनसुध्दा लेखापरीक्षणास असे अभिलेखे सादर करणेसाठी योग्य तो प्रतिसाद दिला जात नाही. सदर बाब गंभीर स्वरुपाची असल्याने ही बाब पंचायतीराज समितीच्या निदर्शनास आणण्यात येत आहे. उदाहरणादाखल, जिल्हा परिषदेचे विभाग आणि पंचायत समित्या यांनी उपलब्ध न केलेल्या अभिलेखांबाबत घेतलेले आक्षेप खाली दर्शविण्यात आले आहेत.

| अ.क्र. | जिल्हा परिषदेचे नाव | जिल्हा परिषदेचा विभाग | लेखापरीक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | गुंतलेली रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 1 | रायगड | समाजकल्याण | 16 | ----- |
| 2 | रत्नागिरी | समाजकल्याण | 4 | ----- |
| 3 | नाशिक | लघुपाटबंधारे | 218 | 1,33,16,397/- |
| 4 | नाशिक | लघुपाटबंधारे | 224 | 1,25,006/- |
| 5 | नाशिक | लघुपाटबंधारे | 227 | 2,84,69,474/- |
| 6 | नंदुरबार | समाजकल्याण | 10 | 39,95,000/- |
| 7 | जळगांव | बांधकाम | 126 | 1,12,40,862/- |
| 8 | अमरावती | बांधकाम | 24 | ----- |
| 9 | अकोला | शिक्षण | 6 | ----- |
| 10 | अकोला | एकात्मिक बालविकास | 4 | 20,83,677/- |
| 11 | अकोला | एकात्मिक बालविकास | 8 | ----- |
| 12 | अकोला | समाजकल्याण | 4 | ----- |
| 13 | अकोला | वित्त | 6 | 18,869/- |
| 14 | वाशिम | वित्त | 15 | 24,560/- |
| 15 | बुलडाणा | वित्त | 17 | 46,763/- |
| 16 | नागपूर | सामान्य प्रशासन | 17 | 3,30,99,075/- |
| 17 | भंडारा | ग्रामीण पाणीपुरवठा | 12 | 8,89,31,167/- |
| 18 | भंडारा | आरोग्य | 6 | 81,013/- |
| 19 | भंडारा | समाजकल्याण | 8 | 1,21,613/- |
| 20 | भंडारा | महिला व बालकल्याण | 5 | 13,000/- |
| 21 | चंद्रपूर | शिक्षण | 3 | 3,03,51,000/- |
| 22 | गडचिरोली | आरोग्य | 20 | 1,75,538/- |
| 23 | औरंगाबाद | बांधकाम | 20 | 4,25,15,879/- |
| 24 | जालना | सामान्य प्रशासन | 20 | 26,14,794/- |
| 25 | जालना | बांधकाम | 53 | 1,52,785/- |
| 26 | जालना | पशुसंवर्धन | 17 | 79,542/- |
| 27 | बीड | सामान्य प्रशासन | 11 | 21,39,080/- |
| 28 | बीड | शिक्षण | 10 | ------ |
| 29 | बीड | पशुसंवर्धन | 9 | ------ |
| 30 | बीड | समाजकल्याण | 11 | ------ |
| 31 | परभणी | ग्रामीण पाणीपुरवठा | 15 | 1,57,69,294/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 32 | परभणी | ग्रामीण पाणीपुरवठा | 16 | ------ |
| 33 | हिंगोली | सामान्य प्रशासन | 6 | 3,36,23,000/- |
| 34 | हिंगोली | समाजकल्याण | 9 | 43,09,622/- |
| 35 | हिंगोली | भविष्य निर्वाह निधी | 20 | ------ |
| 36 | नांदेड | सामान्य प्रशासन | 37 | ------ |
| 37 | नांदेड | बांधकाम (उत्तर) | 62 | 1,23,58,769/- |
| 38 | नांदेड | ग्रामीण पाणीपुरवठा | 56 | ------ |
| 39 | नांदेड | आरोग्य | 14 | ------ |
| 40 | नांदेड | पशुसंवर्धन | 3 | 20,00,000/- |
| 41 | नांदेड | समाजकल्याण | 13 | 1,44,91,846/- |
| 42 | नांदेड | भविष्य निर्वाह निधी | 17 | 24,000/- |

**3.998 शिल्लक जमा रकमा (थकीत ठेवी) -** महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता नियम, क्रमांक 214 खाली मोडणाऱ्या अनामत रकमा, सुरक्षा अनामत रकमा, इतर ठेव रकमा वगैरे प्रकारच्या जिल्हा परिषद व पंचायत समित्यांकडे जमा होणाऱ्या रकमांचे हिशेब लेखासंहिता नियम 215 प्रमाणे नमुना (फार्म) क्रमांक 71 मध्ये ठेवावयाचे असतात. अशा प्रकारच्या जमा ठेव रकमांपैकी अनामत म्हणून घेतलेल्या रकमा संबंधित मुदत संपल्यावर संबंधितांना त्वरीत परत करणे आवश्यक आहे. तसेच अशाप्रकारच्या देय रकमा जर देय झालेल्या तारखेपासुन 3 वर्षापर्यंत पडून राहिल्या, तर लेखासंहिता नियम क्रमांक 219 प्रमाणे जिल्हा परिषदांच्या महसूलात जमा करणे आवश्यक आहे. परंतु लेखापरीक्षणात अशाप्रकारच्या फार जुन्या अदत्त रकमा जिल्हा परिषदांकडे पडून असल्याचे निदर्शनास आले आहे.

खालील जिल्हा परिषदांकडे 31 मार्च, 2015 अखेर खाली दिल्याप्रमाणे ठेव रकमा शिल्लक होत्या.

| अ.क्र. | जिल्हा परिषदेचे नाव | जिल्हा परिषदेचा विभाग | लेखापरीक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | गुंतलेली रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| **1** | **2** | **3** | **4** | **5** |
| 1 | वाशिम | लघुपाटबंधारे | 7 | 18,09,299/- |

**3.999 थकीत आगाऊ रकमा (थकीत अग्रिम) -** जिल्हा परिषदांमध्ये निरनिराळया योजना, बांधकाम वगैरे बाबी कार्यान्वित करण्यासाठी संबंधित ठेकेदार, विभाग प्रमुख अगर कर्मचारी यांना वेळोवेळी आगाऊ रकमा देण्यात येतात. अशाप्रकारे दिलेल्या रकमांचे संबंधित वर्षाअखेर खर्चाची प्रमाणके व हिशेब देऊन समायोजन/वसुली करणे आवश्यक आहे. अशाप्रकारे अगोदर दिलेल्या आगाऊ रकमांचे समायोजन/वसुली झाल्यावर नवीन आगाऊ रका देता येतात. परंतु जिल्हा परिषदांकडील आगाऊ रकमांच्या नोंदवहया पाहता वेळोवेळी दिलेल्या आगाऊ रकमांचे समायोजन/वसुली होत नसल्याचे आढळून येते. अशा थकीत आगाऊ रकमांमध्ये फार जुन्या म्हणजेच 1962 पासुनच्या आगाऊ रकमांचे समायोजन/वसुली थकीत असल्याचे दिसुन येते. उदाहरणादाखल पुढील जिल्हा परिषदांमध्ये सन 2014-2015 अखेर खाली दिल्याप्रमाणे आगाऊ रकमा समायोजन/वसुली अभावी थकीत होत्या.

| अ.क्र. | जिल्हा परिषदेचे नाव | जिल्हा परिषदेचा विभाग | लेखापरीक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | गुंतलेली रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 1 | ठाणे | वित्त | 12 | 29,64,200/- |
| 2 | रायगड | सामान्य प्रशासन | 10 | 36,50,000/- |
| 3 | रत्नागिरी | वित्त | 4 | 4,04,559/- |
| 4 | धुळे | सामान्य प्रशासन | 14 | 1,71,901/- |
| 5 | धुळे | शिक्षण | 1 | 1,04,215/- |
| 6 | धुळे | लघुपाटबंधारे | 29 | 2,64,330/- |
| 7 | नंदुरबार | वित्त | 6 | 21,72,626/- |
| 8 | जळगांव | सामान्य प्रशासन | 22 | 32,06,169/- |
| 9 | अहमदनगर | वित्त | 14 | 90,14,516/- |
| 10 | सातारा | वित्त | 20 | ------ |
| 11 | सांगली | आरोग्य | 6 | 1,85,930/- |
| 12 | सांगली | कृषी | 3 | 2,71,767/- |
| 13 | सांगली | पशुसंवर्धन | 15 | 1,03,422/- |
| 14 | कोल्हापूर | बांधकाम | 4 | 12,47,192/- |
| 15 | सोलापूर | बांधकाम | 2 | 9,02,611/- |
| 16 | सोलापूर | लघुपाटबंधारे | 4 | 2,88,991/- |
| 17 | सोलापूर | ग्रामीण पाणीपुरवठा | 18 | 84,210/- |
| 18 | सोलापूर | महिला व बालकल्याण | 18 | 14,680/- |
| 19 | सोलापूर | वित्त | 9 | 38,36,125/- |
| 20 | अकोला | बांधकाम | 57 | 97,75,657/- |
| 21 | अकोला | वित्त | 19 | 2,13,63,565/- |
| 22 | वाशिम | बांधकाम | 21 | 3,50,000/- |
| 23 | वाशिम | ग्रामीण पाणीपुरवठा | 6 | 10,37,522/- |
| 24 | बुलडाणा | कृषी | 21 | 8,91,977/- |
| 25 | बुलडाणा | वित्त | 21 | 24,47,548/- |
| 26 | वर्धा | सामान्य प्रशासन | 28 | 7,09,500/- |
| 27 | चंद्रपूर | महिला व बालकल्याण | 16 | 8,78,728/- |
| 28 | गडचिरोली | वित्त | 4 | 1,20,79,583/- |
| 29 | औरंगाबाद | वित्त | 6 | 48,05,617/- |
| 30 | जालना | लघुपाटबंधारे | 21 | 3,00,000/- |
| 31 | जालना | शिक्षण | 5 | 1,00,000/- |
| 32 | हिंगोली | शिक्षण | 9 | 26,50,000/- |
| 33 | हिंगोली | वित्त | 5 | 32,28,366/- |
| 34 | नांदेड | वित्त | 4 | 16,35,875/- |
| 35 | उस्मानाबाद | लघुपाटबंधारे | 25 | 3,70,070/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 36 | उस्मानाबाद | वित्त | 16 | 72,21,477/- |
| 37 | लातूर | कृषी | 18 | 92,942/- |

**3.1000 सन 2014-2015 या वर्षात जिल्हा परिषद व पंचायत समितीमध्ये झालेल्या इतर नियमबाह्य बाबी.**

| अ.क्र. | नियमबाह्य बाबींचे स्वरुप | जिल्हा परिषदेचे नाव | जिल्हा परिषदेचा विभाग | लेखापरीक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | गुंतलेली रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| **1** | **2** | **3** | **4** | **5** | **6** |
| 1 | कमी / जादा खर्च अनुदान निर्धारण | अहमदनगर | बांधकाम | 1 | 81,54,000/- |
| | | अमरावती | शिक्षण | 2 | 16,51,90,192/- |
| | | अमरावती | वित्त | 1 | 6,31,74,317/- |
| | | गडचिरोली | कृषी | 21 | 10,85,70,530/- |
| | | औरंगाबाद | बांधकाम | 1 | ------ |
| | | औरंगाबाद | वित्त | 1 | ------ |
| | | नांदेड | लघुपाटबंधारे | 1 | 3,67,79,343/- |
| 2 | अफरातफर / अपहार प्रकरणे. | ठाणे | सामान्य प्रशासन | 3 | ----- |
| | | रायगड | सामान्य प्रशासन | 4 | 11,50,85,722/- |
| | | रत्नागिरी | सामान्य प्रशासन | 19 | 2,42,77,670/- |
| | | सिंधुदूर्ग | सामान्य प्रशासन | 5 | 6,88,67,816/- |
| | | सातारा | सामान्य प्रशासन | 11 | 5,55,61,462/- |
| | | वाशिम | सामान्य प्रशासन | 8 | 8,65,46,514/- |
| | | उस्मानाबाद | ग्रामीण पाणीपुरवठा | 19 | 1,39,90,917/- |
| 3 | पोहोच पावत्या उपलब्ध नसणेबाबत / उपयोगिता प्रमाणपत्र उपलब्ध नसणेबाबत. | रत्नागिरी | पशुसंवर्धन | 5 | 19,99,998/- |
| | | सातारा | सामान्य प्रशासन | 9 | 7,62,635/- |
| | | कोल्हापूर | कृषी | 21 | 1,08,800/- |
| | | अमरावती | एकात्मिक बालविकास | 3 | 3,25,225/- |
| | | अकोला | एकात्मिक बालविकास | 5 | 66,50,000/- |
| | | वाशिम | महिला व बालकल्याण | 12 | 3,48,118/- |
| | | वर्धा | सामान्य प्रशासन | 24 | ------- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | परभणी | सामान्य प्रशासन | 8 | 1,41,24,788/- |
| | | परभणी | सामान्य प्रशासन | 16 | ------ |
| 4 | नोंदवह्यांबाबत / त्रुटींबाबत | रायगड | बांधकाम | 44 | ----- |
| | | रायगड | बांधकाम | 45 | ----- |
| | | धुळे | वित्त | 21 | ----- |
| | | धुळे | वित्त | 22 | ----- |
| | | अमरावती | पशुसंवर्धन | 18 | ----- |
| | | औरंगाबाद | ग्रामीण पाणीपुरवठा | 20 | ----- |
| | | जालना | वित्त | 11 | ----- |
| | | परभणी | बांधकाम | 53 | ----- |
| | | परभणी | पशुसंवर्धन | 13 | ----- |
| 5 | रोखवही व बँक पासबुक यांच्या शिल्लकेतील तफावतीबाबत. | धुळे | वित्त | 4 | 3,75,55,120/- |
| | | सातारा | पशुसंवर्धन | 8 | ----- |
| | | बुलडाणा | वित्त | 3 | ----- |
| | | नागपूर | वित्त | 2 | 61,87,99,693/- |
| | | गोंदिया | वित्त | 4 | 21,29,41,617/- |
| 6 | आयकर/ स्वामित्वधन / विमा वसुली/ मुल्यवर्धित कर/ मुद्रांका बाबत | नागपूर | लघुपाटबंधारे | 16 | 87,310/- |
| | | नागपूर | आरोग्य | 10 | 25,191/- |
| | | गडचिरोली | शिक्षण | 9 | 12,266/- |
| | | परभणी | बांधकाम | 54 | 1,08,56,313/- |
| 7 | जादा वेतन अदाई | नाशिक | आरोग्य | 6 | 14,54,775/- |
| | | नंदुरबार | बांधकाम | 4 | 2,64,800/- |
| | | वाशिम | लघुपाटबंधारे | 1 | ------- |
| 8 | मुदत बाह्य धनादेश / असंवितरीत धनादेश. | नंदुरबार | वित्त | 9 | 18,21,805/- |
| 9 | तगाई वसुलीबाबत. | ठाणे | सामान्य प्रशासन | 16 | 59,46,528/- |
| 10 | थकित ठेव / अनामत नोंदवहीबाबत. | ठाणे | वित्त | 8 | 12,31,49,945/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 11 | थकित कराबाबत | ठाणे | वित्त | 13 | 3,90,46,050/- |
| | | सिंधुदूर्ग | सामान्य प्रशासन | 21 | 3,46,000/- |
| 12 | अनुदान निर्धारणाबाबत. | पुणे | शिक्षण | 2 | ----- |
| | | परभणी | लघुपाटबंधारे | 23 | ----- |
| 13 | शासकीय कर्ज वसुलीबाबत | रायगड | सामान्य प्रशासन | 11 | 35,48,786/- |
| 14 | 20% जि.प.उपकर मधुन पुरवठा केलेल्या साहित्य वाटपाबाबत. | कोल्हापूर | समाजकल्याण | 14 | 42,29,819/- |
| 15 | हातपंप दुरुस्तीबाबत. | अकोला | गामीण पाणीपुरवठा | 6 | 18,22,707/- |
| 16 | संगणक खरेदीमधील अनियमिततेबाबत. | बुलडाणा | सामान्य प्रशासन | 25 | 36,48,880/- |
| 17 | भविष्य निर्वाह निधी वर्गणीची जादा रक्कम खात्यामध्ये जमा करणेबाबत. | नागपूर | भविष्य निर्वाह निधी | 1 | 5,500/- |
| 18 | नाला सरळीकरण व खोलीकरण कोळोणा घोडेगाव, तालुका देवळी येथील अनियमिततेबाबत. | वर्धा | लघुपाटबंधारे | 4 | 5,07,686/- |
| 19 | जादा अग्रिम प्रदान केल्याबाबत. | भंडारा | वित्त | 10 | 25,000/- |
| 20 | कर्मचाऱ्यांच्या प्रतिनियुक्तीबाबत. | परभणी | आरोग्य | 17 | ----- |
| 21 | घसारा निधीबाबत | परभणी | वित्त | 13 | ----- |
| 22 | मत्स्य व्यवसाय ठेका रक्कम थकबाकी व वसुलीबाबत. | उस्मानाबाद | लघुपाटबंधारे | 22 | 1,43,030/- |